कारणे दाखवा नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग,
क्र.माध्य/शि/१/कावि/१०४/२०२५
दिनांक- ७/०२/२०२५

प्रति,
श्री.जाधव रविंद्र प्रल्हाद,शिपाई
माध्यमिक विद्यालय खराळवाडी भागशाळा जाधववाडी

विषय –विनापरवाना गैरहजेरीबाबत.
संदर्भ – 1) माविखरा/०१/कावि/३८७/२०२४ दि.०५/१२/२०२४
2)माविखरा/०१/कावि/४०१/२०२४ दि.१६/१२/२०२४
3)माविखरा/०१/कावि/४१३/२०२४ दि.२६/१२/२०२४

ज्याअर्थी तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागात शिपाई या गट – ड च्या जबाबदारीच्या पदावर मा.वि.खराळवाडी भागशाळा जाधववाडी या विद्यालयात कार्यरत आहात, तुम्हास तुमच्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी ज्ञातच आहे.दि.२५/०७/२०२३ ते ०४/१०/२०२३ व १९/०३/२०२४ ते १९/०४/२०२४ व २४/७/२०२४ ते २८/०८/२०२४ असे एकुण – १४१ दिवस व दि.११/१२/२०२४ पासुन आजअखेर ४८ दिवस एकुण १८९ विनापरवाना गैरहजर असल्याचे निर्दशनास येत आहे.

अणि ज्याअर्थी मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय खराळवाडी यांनी संदर्भीय क्र.०१ ते ०३ अन्वये तुम्हास नोटीस पाठवणेत आलेल्या होत्या. सदर नोटीसचा खुलासा तुम्ही आजअखेर मुख्य कार्यालयात अथवा विद्यालयात सादर केलेला नाही.सदर बाब कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीकोनातुन अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.तम्हास वेळोवेळी लेखी अथवा तोंडी सांगुनसुध्दा तुमच्या उपस्थिती बाबत कोणतीही सुधारणा होत नाही.सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असुन कार्यालयीन / शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने उचीत नाही.प्रकरणी उदघत विद्यालयात गैरहजर राहुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ०३ (१) (एक) (दोन) (तीन) मधील तरतुदीचा भंग केल्याचे सकृतदर्शनी निर्दशनास येत आहे.

त्याअर्थी तुम्ही केलेल्या कार्यालयीन /शैक्षणिक कामकाजातील हलगर्जीपणाबाबत तुमचे विरूद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (५६) (२) (ड) नुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा सदर नोटीस प्राप्त झालेपासून ०७ दिवसांच्या आत विद्यालयामार्फत सादर करणेत यावा, विहीत मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास अथवा केलेला खुलासा असमाधानकारक असल्यास तुमच्यावर उक्त नोटीसमध्ये केलेली कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी

सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रत,

१) मा.उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
मा.माहीतीसाठी सादर

२) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय खराळवाडी भागशाळा जाधववाडी सदरचे कारणे दाखवा नोटीस संबंधिताना बजावून पुर्तता अहवाल सादर करणेत यावा.